महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हील लाईन्स, नागपूर-440 001
Email-msboardnagpur@gmail.com
दूरध्वनी क्रमांक: 0712 -2565403 /2560209 /2553401, फॅक्स क्रमांक : 0712-2561775

महत्वाचे
कालमर्यादीत

पत्र क्रमांक : नाविमं/उ.मा. प्रात्य./ 148
नागपूर, दिनांक: 16 / 01/2023

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
व उच्च माध्यमिक विद्यालये, नागपूर विभाग नागपूर.

विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी )फेब्रु/मार्च 2023 मध्ये घेण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत.

संदर्भ : 1)क्र.रा.मं./परीक्षा–6/6973, दि. 30/12/2022,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार ज्या विषयाची प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षा आहे अशा विषयांची प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षा तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक विषयाची (E-3, E-5, E-6, व F-6, F-8 आणि G-1 ते G-6, G-7, G-8, G-9) विषयांची प्रात्यक्षिक लेखी बुधवार दि. 01/02/2023 ते सोमवार दिनांक: 20/02/2023 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तसेच याच कालावधीत पूनर्परीक्षार्थी विद्यार्थ्याची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी.याशिवाय इ.12 वी च्या विज्ञान, कला, वाणिज्य व व्यावसायिक शाखांतील विषयांची श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित कनिष्ठ महाविदयालयांना देण्यात येत आहे.

तसेच मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची OUT OF TURN ची प्रात्यक्षिक परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि. 23/03/2023 ते दि. 25/03/2023 या कालावधीत जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आलेली आहे. सदर परीक्षेचे निर्धारीत शुल्क संबधित जिल्हा केंद्रावर जमा करावे.

**OUT OF TURN परीक्षेचे जिल्हा निहाय केंद्र खालील प्रमाणे आहेत.**

1) लाल बहादूर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा
2) जिल्हा परिषद ज्युबिली कनिष्ठ महाविद्यालय, चंद्रपूर
3) पटवर्धन हायस्कुल सिताबर्डी, नागपूर
4) न्यू. इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा
5) शिवाजी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडचिरोली
6) गुजराती नॅशनल कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया

## प्रात्यक्षिक परीक्षेबाबत महत्वाच्या सूचना

1 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा–या नियमित व पुनर्परिक्षार्थी विदयार्थ्यांना प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षेस प्रविष्ठ होणे अनिवार्य राहिल. कोणत्याही पुनर्परिक्षार्थी विदयार्थ्यांचे प्रात्यक्षिक/ तोंडी परीक्षेचे पूर्वीचे गुण ग्राहय धरण्यात येणार नाही. श्रेणी सुधार योजने अंतर्गत [class improvement scheme] प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांना प्रात्यक्षिक/ तोंडी व श्रेणी विषयाच्या परीक्षेस प्रत्येक वेळी पुन्हा नव्याने प्रविष्ठ व्हावे लागेल.

2. ज्या कनिष्ठ महाविद्यालयात तांत्रिक विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेची सोय उपलब्ध नसेल अशा संबंधित प्राचार्यानी तंत्र कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रमुखांशी तांत्रिक विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत संपर्क साधून विदयार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेसंबंधीची योग्य ती माहिती देण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेसंबंधिच्या तारखा लेखी कळवाव्यात

3 परीक्षेच्या आयोजनासाठी असणारी प्रपत्रे, उत्तरपत्रिका, गुणपत्रिका, इत्यादी साहित्य मंडळामार्फत दि. 28/01/2023 रोजी जिल्हा वाटप/ संकलन केंद्रावर वाटप करण्यात येईल.

Z

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हील लाईन्स, नागपूर-440 001
Email-msboardnagpur@gmail.com
दूरध्वनी क्रमांक: 0712 -2565403 /2560209 /2553401, फॅक्स क्रमांक : 0712-2561775



प्रात्यक्षिक परीक्षेचे OMR गुणपत्रिकेमध्ये गुण भरतांना अंतर्गत/बहिर्गत परीक्षकांनी खालील सूचनांचे पालन करावे.

01. OMR गुणपत्रिका स्टॅपल, घडी करू नये.

02. गुण भरतांना बैठक कमांकाच्या समोरच्या चौकटीतच सुवाच्च अक्षरात गुण भरावे, व त्या अनुषंगाने OMR चे वर्तुळ काळया/निळया [Black/Dark Blue] शाईने भरावे. गुणपत्रिकेमध्ये खाडाखोड [Overwriting] होणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

03. हजेरी अहवालात सर्व विद्यार्थ्यांची नोंद विषयनिहाय बैठक कमांकानुसार [Seat No.Wise] करण्यात यावी. अनुपस्थित विद्यार्थ्यांची [AA], No Candidate [NC] अशी लाल शाईने नोंद करण्यात यावी. हजेरीपटावर दोन्ही परीक्षकांची स्वाक्षरी घेण्यात यावी. उपस्थित विद्यार्थ्याची स्वाक्षरी घेण्यात यावी व त्यापुंढे विद्यार्थ्याने वापरलेल्या उत्तरपत्रिकांची नोंद करण्यात यावी.

04. गुणपत्रिकेमध्ये अंतर्गत/बहिर्गत परीक्षकांनी गुण नोंदविले आहेत किंवा नाही, संबंधित अनुपस्थित बैठक कमांकासमोर लाल शाईने AA अशी नोंद केली आहे किंवा नाही, विषय बदल, अतिरिक्त बैठक कमांकाने प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्याचे गुण [Extra marksheet] मध्ये नोंद केलेली आहे किंवा नाही, दोन्ही परीक्षकांची प्रत्येक पानावर स्वाक्षरी घेण्यात आली किंवा नाही, याची खात्री करून मंडळाने पाठविलेल्या पाकिटातच सर्व विषयाच्या प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन गुणपत्रिका [Sr.No.Wise] सिलबंद करून पाठविण्यात याव्यात. ग्रेड विषयांच्या OMR ग्रेड विषयाच्या पाकिटामध्ये सिलबंद करून पांठविण्यात यावेत. जेवढे विदयार्थी प्रात्यक्षिक परीक्षेस प्रविष्ठ झाले त्या सर्वांचे गुण व उत्तरपत्रिका मंडळात जमा केल्याची खात्री करण्यात यावी.

05. विद्यार्थ्याने ऐनवेळेस विषय बदलला असल्यास पूर्वीच्या विषयाच्या बैठक कमांकापुढे MM करून पुढे नवीन विषय कोणता घेतला आहे याची स्पष्ट नोंद करावी. यात नवीन विषयाचे गुण मंडळाने झेरॉक्स प्रत दिलेल्या [Extra marksheet] वर नोंदवून त्याच्याच कनिष्ठ महाविद्यालयातील अंतर्गत/बहिर्गत [Internal व External] परीक्षकांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयाने संबंधीत जिल्हयाच्या संकलन केंद्रावर दि. 23/02/2023 रोजी सकाळी 11.00 ते 5.00 या वेळेत आपल्या प्रतिनिधी मार्फत खालील साहित्य जमा करावे.**

1 प्रात्यक्षिक/तोंडी/अतंर्गत मूल्यमापन विषयाच्या OMR गुणपत्रिका Cover-D पाकिटात सिलबंद करून मंडळ प्रतिनिधीकडे सादर कराव्यात.

2 हजेरी/गैरहजेरी अहवाल सर्व प्रात्यक्षिक विषयांचे तोंडी व अतंर्गत मूल्यमापन विषय निहाय स्टॅपल करावेत. श्रेणी विषयाच्या OMR श्रेणी पाकिटामध्ये भरण्यात यावी.

3 प्रात्यक्षिक विषय निहाय उत्तरपत्रिका स्वतंत्र पाकिटामध्ये सिलबंद करून दयावेत. पाकिटावर कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक कमांक/ विषय कोड व विषय/बैठक कमांक पासून ते पर्यंत/एकूण उत्तरपत्रिका नमूद करावे.

4 प्रात्यक्षिक परीक्षेबाबतची इतर कागदपत्रे, वेळापत्रक, इत्यादी सोबत जिल्हाच्या संबंधीत संकलन केंद्रावर जमा करावेत.

जिल्हा संकलन केंद्र खालील प्रमाणे :–

1) लाल बहादूर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा
2) नंदलाल पाटील कापगते विद्यालय, साकोली
3) जिल्हा परिषद ज्युबिली कनिष्ठ महाविद्यालय, चंद्रपूर
4) जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नागभीड
5) नागपूर विभागीय मंडळ कार्यालय, नागपूर
6) न्यू. इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा
7) शिवाजी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडचिरोली
8) धर्मराव विद्यालय, आलापल्ली
9) हितकारणी विद्यालय, आरमोरी
10) गुजराती नॅशनल कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया

z